नि.फौ.ख.क्र. ११३१/२०२३

सरकार –वि– गजानन रायपुरे

नि.क्र. १०

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – गजानन प्रल्हाद वाघमारे,

वय. ४७ वर्षे, व्यवसाय – पोलीस हवालदार,

राहणार – शेगाव, ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती शहा, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>**

१. सन २०२३ मध्ये मी शेगाव शहर पोलीस स्टेशन येथे पोलीस हवालदार म्हणून कार्यरत होतो. दि.१९.०८.२०२३ रोजी पोलीस स्टेशनला हजर असतांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, शेगाव येथील जिजामाता चौकात एज्यु संस्कार अकॅडमीच्या परिसरात एक इसम तंबाखुजन्य पदार्थाची विक्री करीत आहे. दोन पंचांना पोलीस स्टेशनला बोलावून त्यांना व इतर पोलीस कर्मचाऱ्यांना खबरेची माहिती देवून पंच व पोलीस कर्मचाऱ्यांसह आम्ही शासकीय वाहनाने घटनास्थळावर गेलो. घटनास्थळावर जावून पाहणी केली असता भक्ती जनरल स्टोअर्समध्ये एक इसम लहान मुलांना तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थाची विक्री करतांना आम्हाला दिसून आला. त्यानतर आम्ही त्या टपरीजवळ गेलो असता आम्हाला बघून तेथे असलेले लहान मुल पळून गेले. पंचांसमक्ष टपरीची पाहणी केली असता गायछाप तंबाखुच्या १० पुड्या, रवाल तंबाखुच्या २० पुड्या, एक ब्रिस्टोल सिगारेटचे पॅकीट व फोर्सक्रेअर सिगारेटचा एक पॅकेट असा एकुण ३६०/– रुपयांचा माल मिळून आला. टपरी चालविणाऱ्या इसमाचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव गजानन रायपुरे असे सांगितले. त्यानंतर पंचासमक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार करुन मुद्देमाल जप्त केला व पोलीस स्टेशन शेगाव शहर येथे येवून फिर्याद दिली. आता मला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविला. त्यावर माझी, पंचांची व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **<u>नि.क्र.११</u>** देण्यात येते. आता फिर्याद व छापील एफ.आय.आर. दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **<u>नि.क्र.१२ व १३</u>** देण्यात येते. जप्त मुद्देमाल मुद्देमाल पावती भरुन हेडमोहररकडे जमा केला. आता मला मुद्देमाल पावती दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **<u>नि.क्र.१४</u>** देण्यात येते. तपास अधिकाऱ्यांनी आरोपीला सुचनापत्रावर

सोडले.  या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार गणेश वाकेकर यांनी केला होता. तपासी अधिकाऱ्यांनी माझे बयाण नोंदविले होते. आरोपीला मी ओळखतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्रीमती व्ही. व्ही. कुमकुले, वकील यांचे मार्फत.</u>**

२.  घटनेच्या दिवशी मी कर्तव्यावर हजर असल्याचे दस्त तपासी अधिकाऱ्याला दिले नव्हते व त्यामुळे ते दोषारोपपत्रात समाविष्ट करण्यात आले नाहीत. आरोपीच्या टपरीवर छापा टाकण्यापूर्वी मी माझी व पंचांची अंगझडती दिली होती. मी स्वतःच्या व पंचांच्या अंगडतीचा पंचनामा केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मुद्देमाल आरोपीकडून जप्त न केल्यामुळे आम्ही स्वतःच्या अंगझडतीचा पंचनामा तयार केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयात उपस्थित असलेल्या आरोपीविरुध्द मी फिर्याद दिली नव्हती व न्यायालयात हजर असलेल्या आरोपीकडून मी कोणताही मुद्देमाल जप्त केला नाही. आता मला छापील एफ.आय.आर. दाखविण्यात आली. त्यामध्ये सोपान गजानन मोरखडे यांच्याकडून पंचासमक्ष मुद्देमाल जप्त केल्याचे नमुद आहे. हे म्हणणे खरे नाही की, तंबाखुच्या केसेस करण्याकरीता आम्हाला वरिष्ठांकडून उद्दीष्ट दिल्या जाते व ते उद्दीष्ट पुर्ण करण्याकरीता मी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, छापील एफ.आय.आर. वरुन या प्रकरणातील न्यायालयात हजर असलेल्या आरोपीचा या गुन्ह्याशी काही संबंध नाही.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>यावेळेस सरकारी विधीज्ञांनी छापील एफ.आय.आर. बाबत फेरतपासणी घेण्याची विनंती केली. छापील एफ.आय.आर. ही नवीन बाब नसल्यामुळे त्याबाबत सरकारी वकीलांची फेरतपासणी घेण्याची विनंती फेटाळण्यात येते.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (एन. डी. मेश्राम ) | (एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.०९.०२.२०२६ | दि.०९.०२.२०२६ |